नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०४/२०२५ (सोमवार)

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ६० लाख ८० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,भिवापुर पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक २०/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीस **भिवापुर टी पॉईंट हायवे वर नाकाबंदी करीत असतांना पोलीसांना ट्रक कमांक एम.एच. ४० सी.झेड. ४३५८ आणि ट्रक कमांक एम.एच. ४९ बी.झेड. ५५६८ हे दोन वाहन मिळुन आले. पोलीसांनी दोन्ही वाहन थांबविले असता त्याच वेळी एक स्कॉर्पीओ वाहन कमांक एम.एच. ४९ सी.एल. २४२६ याच्या चालकाने नमुद ट्रक चालकांना वाहन कशाला थांबविले असे बोलुन पोलीसांना पाहुन वाहन घेवुन पळुन गेला.** पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक कमांक एम.एच. ४० सी.झेड. ४३५८ चालक आरोपी **नामे नितेश रमेश लसणे वय ३० वर्षे, रा.पाहरणी ता नागभिड** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक **सचिन सुनिल बोकडे रा.चिचाळा ता भिवापुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. तसेच **ट्रक कमांक एम.एच. ४९ बी.झेड. ५५६८** चालक आरोपी **नामे रामदास महादेवराव जाधव वय ४२ वर्षे रा.भवानी मंदीर जवळ पारडी नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक **आकाश जयराम पांडे रा.बेसा नागपुर असे सममले. चालक हे मालकांच्या** सांगण्यावरून अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक करत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. **स्कॉर्पीओ वाहन कमांक एम.एच. ४९ सी.एल. २४२६ चा चालक नमुद आरोपीतांना रेतीची चोरटी वाहतुक करण्यास सहकार्य करीत असल्याबाबत समजले.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रक कमांक एम.एच. ४० सी.झेड. ४३५८ आणि त्यामधुन ८ ब्रास रेती असा असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल , २) ट्रक कमांक एम.एच. ४९ बी.झेड. ५५६८ आणि**

**त्यामधुन ८ ब्रास रेती असा असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल दोन्ही वाहनासह १६ ब्रास रेती एकुण ६०,८०,००० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक , मालक आणि **स्कॉर्पीओ वाहन क्रमांक एम.एच. ४९ सी.एल. २४२६ चा चालक** आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम ,कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **नमुद वाहन (ट्रक) चालकाला पोलीसांनी अटक केली आहे.**

## उमरेड येथे सुरू असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या एका पिडीत महिलेची सुटका, एक आरोपी अटक

**पोलीस स्टेशन उमरेड :—** दिनांक २०/०४/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन ,उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड तथा सहा.पोलीस अधिक्षक उमरेड यांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, जिंदाल कॅम्पेक्स, उमरेड फ्लॅट क्रं १०१ येथे एक महीला आरोपी स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता मुलींना पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन त्यांच्याकडुन देहव्यापार करवुन घेत आहे. अशी गुप्त माहीती मिळाल्याने उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड आदेशाने उमरेड पोलीसांनी जिंदाल कॅम्पेक्स, उमरेड फ्लॅट क्रं १०१ येथे धाड टाकली असता **एक महीला आरोपी ही अनैतिक देहव्यापार चालवत असतांना मिळुन आली.** पोलीसांनी घटनास्थळावरून २ मोबाईल आणि रोख रक्कम व ईतर साहीत्य असा एकुण ४२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद महीला आरोपी विरूद्ध पोस्टे उमरेड येथे कलम ३, ४, ५,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंद करून एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. **सदर प्रकरणी पोलीसांनी नमुद महीला आरोपीला अटक केली आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत देवलापार पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी क्र. **१. रत्नाकर जिवन खेब्रागडे, वय ५६ वर्षे, रा वैशाली नगर नागपुर जि.नागपुर** हा मौजा लाल दिवान शाहा दर्गा जवळ , **अरोपी क्र २ जय राजेश नगराळे, वय २५ वर्षे,नागपुर** हा मौजा कटटा, मेवाडी धबा चे बाजुला **आरोपी क्र ३ विपुल जनकनंदन डोगर, वय १९ वर्षे रा काजी वार्ड हिगनघाट ह.मु नागपुर जि.नागपुर** हा मौजा मानेगाव टेक शिवार येथे,**आरोपी क्र ४. मोहम्मद रीजवान मोहम्मद शरीफ अन्सारी, वय ३८ वर्षे, रा पंचशील नगर राणी दुर्गा वती चौक .नागपुर** हा मौजा बस स्टॉप जवळ आणि **आरोपी क्र ५ विकास भाउराव अंबादे, वय २४ वर्षे रा वैशाली नगर नागपुर जि.नागपुर** हा बस स्टॉप जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद ५ आरोपीतांवर पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम २७ एन.डी.पी.एस. कायदा अन्वये ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत मौदा पोलीस पेट्रोलीग करीत असतांना **आरोपी नामे दिगांबर देवराव मानकर,वय ४४ वर्षे, रा. जयस्तंभ चौक मौदा हा** मौजा कन्हान नदीचे पात्रात गणेश मंदीरजवळ मौदा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीवर पोलीस स्टेशन मौदा येथे कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने